**प्रश्न –** नाथसंप्रदायाच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेऊन गोरक्षनाथांचे वाङ्मयीन कार्य विशद करा. (MA-2001)

किंवा

* नाथ संप्रदायाची वैशिष्ट्ये नोंदवा. (MA-2003)

किंवा

नाथसंप्रदायाचे वाङ्मयीन कार्याच्या इतर पृथक्... हा संप्रदाय वैशिष्ट्यपूर्ण ... संस्कारात्मक ... आकलनाच्या ... करणारा ... क्रियाशील

→ **प्रस्तावना –**

महाराष्ट्रातील इतर संप्रदायाप्रमाणे नाथ संप्रदायाचे स्थान मराठी वाङ्मयाच्या इतिहासात मोलाचे असलेले दिसून येते. सर्व भारतात कार्य करणाऱ्या या संप्रदायाने अकराव्या, बाराव्या शतकात महाराष्ट्रात धर्मजागृतीचे कार्य अतिशय नेटाने केले. मराठी वाङ्मयाच्या निर्मितीला प्रथमतः नाथ संप्रदायामुळे चालना मिळाली. नाथ संप्रदायाची उदयभूमी म्हणून उत्तर हिंदुस्थानातील काही प्रदेशांचा उल्लेख करण्यात आला आहे. ~~नगर जिल्ह्यातील डोंगर हे आदिनाथाचे स्थान आहे. म्हणून तेथेच हा संप्रदाय उदयास आला असावा असे सांगितले~~ महाराष्ट्र बरोबरच सातारा, ~~नाशिक~~ नाशिक यांच भागात असलेले चौरागीचा डोंगर, मच्छिंद्रगड, गहिनीनाथांचे असलेले मठ इत्यादी स्थळावरून या संप्रदायांच्या महाराष्ट्रातील संप्रदायाचे महत्त्व समजून येते.

शिव हे आद्य गुरु मानले जातात ... शैव ... समाज ... आदिनाथ ... म्हणून ... संप्रदाय ... शिवाचे ... असे

*** नाथ संप्रदायाचे संस्थापक –**

नाथ संप्रदायाचे संस्थापक 'शिव' म्हणजे साक्षात शंकरच असल्याचे सांगितले जाते. हा संप्रदाय श्रीशंकरानेच प्रस्थापित केला असा उल्लेख केलेला आढळतो. नाथ संप्रदाय हा मुख्यतः शैवसंप्रदायी परंतु शिव, विष्णु दोघांचा प्रचार आणि प्रसार या संप्रदायाने केला. या संप्रदायाच्या वाङ्मयीन कार्यापेक्षाही या संप्रदायाचे इतर पंथावर जे परिणाम किंवा संस्कार झालेले आहेत ते वैशिष्ट्यपूर्ण असेच आहेत. आदिनाथ – मत्स्येन्द्रनाथ – गोरक्षनाथ – गहिनीनाथ – निवृत्तिनाथ – ज्ञाननाथ अशी नाथ संप्रदायाची परंपरा आहे.

– नाथ संप्रदायातील परंपरा मच्छिंद्रनाथापासून सुरुवात होते.

Scanned with CamScanner

*** गोरक्षनाथ नाथ संप्रदायाचे प्रेरणास्थान / आधारस्तंभ —**

मत्स्येंद्रनाथ आणि मत्स्येंद्रनाथांचे शिष्य गोरक्षनाथ हे नाथ संप्रदायाचे दोन मुख्य व्यक्ती होत. ज्या काळात कर्मकांडाचे थैमान माजले होते अशा काळात गोरक्षनाथांनी नाथ संप्रदायाचे शुद्धीकरण करण्याचा फार मोठा प्रयत्न केला. मत्स्येंद्रनाथांप्रमाणेच गोरक्षनाथाने धर्मजागृतीसाठी आणि पंथप्रसारासाठी भारतभर संचार केला. गोरक्षनाथांच्या नावावर सुमारे चाळीस ते पन्नास ग्रंथ आहेत. इ.स. १०५० ते ११५० या कालखंडात गोरक्षनाथाने आपले कार्य केले. गोरक्षनाथ संस्कृतमध्ये लेखन केले असले तरी 'अमरनाथ संवाद' व 'गोरक्षगीता' ही दोन ओवीबद्ध प्रकरणे मराठीत आढळतात. तत्त्वप्रसारासाठी लोकभाषेच्या माध्यमाचा पुरस्कार करणारे गोरक्षनाथ हे पहिले भारतीय पुरुष ~~असल्याचे~~ आहेत. प्रा. रा. चिं. ढेरे म्हणतात, "गोरक्षनाथांचा विराट आत्मा चक्रधरांच्या नजरेतून वाहतो आहे, ज्ञानेश्वरांच्या अंतःकरणातून डोकावतो आहे, कबीरांच्या कंठातून हुंकारतो आहे. नामदेवांच्या समृद्धीत वसत आहे आणि संतवाणीतून गंगेसारखा धावत आहे."

*** गोरक्षगीता —**

मध्ययुगीन काळातील एक प्रभावी व्यक्ती म्हणून गोरक्षनाथ सर्वांना परिचित आहेत. अपूर्व संघटनशक्तीच्या बळावर गोरक्षनाथांनी नाथ संप्रदायाला व्यवस्थित असे रूप दिले. इतर सर्व उपलब्ध ग्रंथापेक्षा 'गोरक्षगीता' हा ग्रंथ नाथ संप्रदायातील एक महत्त्वाचा ग्रंथ म्हणून ओळखला जातो. 'अमरनाथ संवाद' किंवा गोरक्षगीता हे दोन्हीही ग्रंथाबद्दल मात्र शंका व्यक्त केली जाते. गोरक्षनाथांनी केलेला उपदेश त्यांचा गहिनीनाथ याने आपल्या शिष्य मेंढकीकरिता लिहून ठेवला, म्हणून याचे कर्तृत्व गोरक्षनाथाऐवजी गहिनीनाथाकडे असल्याचे सांगितले आहे. ("हे गोरक्षगीता / गहिनीनाथ संवादु ।।" या उल्लेखावरून, गोरक्षगीता प्रकरण गहिनीनाथांनी रचले असावे, असे म्हटले जाते.) असे असले तरी

*** नाथ संप्रदायाचे कार्य**

गोरक्षनाथांचे सामाजिक व पारमार्थिक कार्य नाथ संप्रदायात भव्य व दिव्य आहे हे मात्र विसरता येणार नाही.

संस्कृत व हिंदी भाषेत काही ग्रंथ.

* गोरक्षगीतामध्ये योगानुभवाचे वर्णन आले. गोरक्षनाथांनी केलेला उपदेश त्यांचा शिष्य गहिनीनाथ याने आपल्या शिष्य मेंढकीकरिता लिहून ठेवलेला आहे. यातील काही ओव्यांचा व ज्ञानेश्वरीतील ६ वा अध्याय यात बरेच साम्य आहे.

Scanned with CamScanner

## * नाथ संप्रदायाचे कार्य — (तत्त्वज्ञान)

### 1) लोकभाषेचा स्विकार — स्वीकार —

ज्या काळात संस्कृत भाषेला स्थान होते अशा काळात गहिनाथांनी लोकभाषेचा स्विकार केला. महाराष्ट्रात नाथ संप्रदायाची मुहूर्तमेढ गहिनीनाथांनी केली. नाथभक्ती ही सर्वत्र भ्रमण करणारी म्हणून हा पंथ बहुभाषी पंथ म्हणून ओळखला जातो. वैदिकांच्या धर्मभाषेपेक्षा, संस्कृत देववाणीपेक्षा प्रादेशिक भाषेला म्हणजेच लोकवाणीला या संप्रदायातील व्यक्तींनी प्रोत्साहन दिले त्यामुळेच भारताच्या प्रत्येक भागात नाथपंथाचा प्रभाव दिसून येतो. सर्वसामान्य लोकांपर्यंत आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या संप्रदायांनी लोकभाषेचा स्वी स्विकार केला. हे या संप्रदायाचे त्याकाळातील एक महत्त्वाचे कार्य म्हणून नोंदवला येईल.

### 2) शिव - विष्णु ऐक्याचा प्रचार —

* हरिहरा भेद नाही तुकाराम

नाथसंप्रदाय हा मूळचा शैव संप्रदायी असला तरी आपल्या संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करित असताना शिव आणि विष्णु यामध्ये तो भेद केला नाही. उलट शिव-विष्णु ऐक्याचा प्रचार या पंथांनी केला. त्यामुळे इतर प्रांतामध्ये शैव - वैष्णवात जे भांडणे होत होती ते भांडणे महाराष्ट्रात झाली नाहीत. एकंदरीत शक्तीयुक्त शिवरूपाच्या अद्वैतानुभूतीस प्रमाण मानणारा हा संप्रदाय कायायोगापेक्षा आत्मशुद्धीवर भर दिला. कठीण असलेले तत्त्वज्ञान या संप्रदायाने हिंदी, मराठीतून सांगितले. योगमार्गाला या पंथाने व्यवस्थित असे रूप दिले. हेच या संप्रदायाचे महत्त्वाचे ~~कार्य म्हणून आपल्याला सांगता येते.~~
नाकारता

### समारोप —

नवव्या शतकात अस्तित्वात आलेल्या नाथ संप्रदायाने कालाची गरज लक्षात घेऊन

वेगवेगळ्या प्रांतात आपले कार्य केले. अभिजनांपेक्षा बहुजनांना या संप्रदायाने महत्त्व दिले. मराठी भाषेचे महत्त्व वाढविले. व पुढील काळात जे काही संप्रदाय उदयास आले त्यासर्व संप्रदायावर नाथ संप्रदायाचा मोठा प्रभाव पडला. म्हणूनच वारकरी पंथाचा पाया रचणारे संत ज्ञानेश्वरांनी या पंथाला 'महापंथ' असे म्हटले. महाराष्ट्रात लोकभाषेचा पाया नाथ संप्रदायानी घातला. नाथपंथानी घालून दिलेला कित्ता पुढील पंथानी गिरविला हेच या पंथाचे वेगळे असे वैशिष्ट्य आहे.

* स्वरूप, कार्य, वैशिष्ट्ये

1) शिव हे आद्य संस्थापक
2) नाथ संप्रदायाचे आधारस्तंभ गोरक्षनाथ.
3) गोरक्षगीता
4) गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान
5) गोरक्षनाथांचे सामाजिक व धार्मिक कार्य.
6) लोकभाषेचा ~~स्विकार~~ स्वीकार
7) वैदिकवादाचे खंडण
8) शिवशक्तीचे अद्वैत तत्त्व
9) शिव व वैष्णव यांचा समन्वय
10) बहुभाषी संप्रदाय
11) कायायोगापेक्षा आत्मशुद्धीला महत्त्व देणारा संप्रदाय
12) हठयोगी सिद्धांताचा पंथ


* संदर्भ –

1) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास → डॉ. ल. रा. नसिराबादकर
2) प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप → ह. श्री. शेणोलीकर
3) गुरु गोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा → डॉ. रा. चिं. ढेरे
4) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास → डॉ. वसंत शिरवाडकर.


Scanned with CamScanner

3) शरीरशुद्धीपेक्षा अंतःशुद्धीला महत्त्व दिले –

नाथ संप्रदायाचे [illegible] वैशिष्ट्य म्हणजे या संप्रदायाने बाहेरील योगापेक्षा, शुद्धीपेक्षा आत्मशुद्धीला महत्त्व दिले नाही. शारीरिक कष्ट सह महत्त्वाचे आहे हे या संप्रदायाने मान्य केले. परंतु यापेक्षा अंतः शुद्धीला म्हणजेच आत्मशुद्धीला ~~महत्त्व~~ त्यांनी विशेष लक्ष दिले.

4) दैहिकवादाचे खंडण केले –

दहाव्या - अकराव्या शतकात कोणतेच मूल्य शिल्लक राहिले नव्हते. त्याकाळातील लोकांना चार्वाकाचे विचार पटलेले होते. यामुळे शारीरिक सुखाचे मूल्य तेवढेच ~~शिल्लक~~ राहिले होते. अशावेळी ~~गोरख~~ नाथ संप्रदायाचे प्रणेते गोरक्षनाथांनी वासनावादी, शरीरवादी मतांना फेटाळून लावले, खंडण केले म्हणजेच खोडून टाकले यालाच दैहिकवादाचे खंडण असे म्हणतात. अशा मताचा पुरस्कार करणारा नाथ संप्रदाय हा पहिला संप्रदाय म्हणून ओळखला जातो. हेच या संप्रदायाचे वेगळेपण होय.

Scanned with CamScanner